# ओला / सुका

कुठे अति पावसाने पूर येत आहे, तर कुठे जमीन कोरडी पडून पिक करपून जात आहे.

दोन्ही परिस्थितीत शेतकऱ्याचे हाल होत आहेत, प्रसंगी गाव; घर सोडून त्याला दुसरीकडे आश्रय घ्यावा लागत आहे.

पुन्हा नवीन; अनोळखी जागी कष्ट आणि नवे प्रयत्न. त्याच्या मनातील व्यथा मांडण्याचा एक प्रयत्न...

घर तुटलं, गाव सुटलं,
पाय फुटलं, दिशा मोकाटून ॥ १ ॥

देह वेशीबाहेर, उंबऱ्यात मन
चर्रर काळजात झालं, सारं आठवूनं ॥ २ ॥

काळ्या मातीत जीवन, पेरलं बियाणं
कधी विरघळलं, कधी गेलं करपूनं ॥ ३ ॥

जाणं नव्या गावा, हर नवाच दिन
आयुष्य नव्याला देणं, झालं गेलं विसरणं ॥ ४ ॥

रान विखुरणं वा, रान बहरणं
थांग न लागे, नियतीच वागणं ॥ ५ ॥

आमचं जीणं, जग पाहत दुरुनं
कर्तव्य लाभलं, ईश्वराच देणं ॥ ६ ॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com FB ID - sachin.kulkarni78